# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.10.2025** **वारःगुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आंध्र प्रदेशातील विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करणार
2. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर
3. नक्षलवादी चळवळीतला वरिष्ठ नेता भूपतीचं गडचिरोलीत आत्मसमर्पण, देशातल्या नक्षल प्रभावित जिल्ह्यांची संख्या कमी झाल्याची गृह मंत्रालयाची माहिती
4. श्रीलंकेच्या पंतप्रधान हरिणी अमरासुरिया आजपासून दोन दिवसांच्या भारत भेटीवर आणि
5. 2030 च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा भारतात अहमदाबादमध्ये घेण्याची कार्यकारी मंडळाची शिफारस

**पंतप्रधान-आंध्रप्रदेश**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आंध्र प्रदेशला भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान ते नंद्याल जिल्ह्यातील श्रीशैलम इथल्या भ्रमरम्बा मल्लिकार्जुन स्वामी वरला देवस्थानाला भेट देऊन पूजा करणार आहेत. त्यानंतर ते श्रीशैलम इथल्या श्री शिवाजी स्फूर्ति केंद्रालाही भेट देणार आहेत. पंतप्रधान आज दुपारी कुरनूल मध्ये एकंदर 13 हजार 430 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. हे प्रकल्प उद्योग,वीज, रस्ते, रेल्वे, संरक्षण उत्पादन आणि पेट्रोलियम तसंच नैसर्गिक वायु यासारख्या प्रमुख क्षेत्रांमधील असणार आहेत. याप्रसंगी पंतप्रधान एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत.

**संरक्षणमंत्री**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत, काल रात्री त्यांचं पुण्यात आगमन झालं. आज सकाळी सिंबायोसिस कौशल्य विद्यापीठाचा पदवी प्रदान समारंभ त्यांच्या उपस्थितीत होणार आहे. तसंच डीआरडीओ इथं संरक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत एक महत्त्वाची बैठक होणार आहे. त्यानंतर ते नाशिकला रवाना होती. नाशिकमध्ये स्वदेशी बनावटीच्या 'तेजस एमके-वन ए' या लढाऊ विमानाच्या उत्पादनाच्या तिसऱ्या टप्प्याचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होईल, तसंच ओझर मिनी स्मार्ट टाऊनशिपचं उद्घाटनही राजनाथ सिंह यांच्या हस्ते होणार आहे.

**प्रत्यार्पण परिषद-शहा**

देशाबाहेर पलायन केलेल्या आरोपींचं प्रत्यार्पण-आव्हानं आणि कृती या विषयावर नवी दिल्लीत आज एका परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या हस्ते या परिषदेचं उद्घाटन होणार आहे. केंद्रीय अन्वेषण विभागानं या दोन दिवसांच्या परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेला केंद्रीय आणि राज्य पोलिस विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसंच परराष्ट्र मंत्रालयातील अधिकारी सहभागी होणार आहेत. पलायन केलेल्या आरोपींचं प्रत्यार्पण करण्यासंदर्भात आंतरराष्ट्रीय पोलिस सहकार्याच्या मुद्द्यांवर यावेळी चर्चा होण्याची अपेक्षा आहे.

**आत्मसमर्पण-गडचिरोली**

नक्षल चळवळीतला मोठा नेता, माओवाद्यांची केंद्रीय समिती आणि पॉलिट ब्युरोचा सदस्य असलेला मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती याच्यासह 61 नक्षलवाद्यांनी काल महाराष्ट्रातील गडचिरोलीत आत्मसमर्पण केलं. ऐकू या विषयीचा वृत्तांत....

**माओवादी कम्युनिस्ट पक्षाचा केंद्रीय समिती सदस्य तथा पॉलिटब्युरो सदस्य मल्लजुला वेणूगोपाल उर्फ भूपती आणि दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीच्या सदस्यांसह एकूण एकसष्ठ नक्षल्यांनी गडचिरोली इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे आत्मसमर्पण केलं. भूपती सारख्या नक्षल चळवळीला बौद्धिक ताकद देणाऱ्या मोठ्या कॅडेट आत्मसमर्पण करणं हे ऐतिहासिक गोष्ट आहे त्याच्या आत्मसमर्पणामुळे माओवादी चळवळीच्या समाप्तीचा चॅप्टर लिहिण्याची सुरुवात गडचिरोलीतून झाल्याचा अभिमान आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले....**

**माओवाद हा शंभर टक्के हद्दपार होणार अशा प्रकारच्या परिस्थितीत आपण पोहोचलेलो आहोत. आणि या लढाईच नेतृत्व गडचिरोली करते आहे कारण आता जी काही या ठिकाणी भूपतीनी भूमिका घेतली आणि गेले महिनाभर सातत्याने आपल्या फोर्सेस च्या संपर्कामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे निगोशिएशन, हे त्या ठिकाणी चालले होते, आणि त्या अंतर्गत त्यांनी घेतलेल्या जाहीर भूमिकेमुळे आज साठ लोक तर या ठिकाणी आलेच आहेत. पण आता उरलेलं जे कैडर आहे. जे छत्तीसगडमध्ये आहे त्यांच्यामध्येही आता मोठ्या प्रमाणात ही भावना तयार झाली आहे. की आता आपण आयडॉलॉजिकल व हारलेलो आहे. आपल्याला भारतीय संविधान हेच या ठिकाणी न्याय देऊ शकत अशा प्रकारची त्यांची भावना झाल्यामुळे, मला विश्वास आहे की पुढच्या काही दिवसात छत्तीसगड मोठ्या प्रमाणात शंभर दीडशेड केडर हा आत्मसम, बाजूला त आणि हा संपूर्ण तथाकथित तत्कालीन जो रेड कॉरिडॉर होता या रेड कॉरिडॉर मधलं आता संपूर्ण माओवाद हा संपुष्टात येईल आणि त्याची सुरुवात ही गडचिरोलीने आणि महाराष्ट्राने केली हा माझ्याकरता अतिशय अभिमान आहे. आणि स्वाभिमानाचा मुद्दा आहे.**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वात नक्षलवादाचा समूळ उच्चाटन करण्याची रणनीती यशस्वी ठरत आहे असं सांगून मुख्यमंत्र्यांनी गडचिरोली पोलीस दलाला एक कोटी रुपयांचं बक्षीसही जाहीर केलं आकाशवाणीच्या बातम्यांसाठी गडचिलीहून जयंत निमगडे.**

**<u>छत्तीसगड</u>**

छत्तीसगडमधे सुकमा इथं देखील 50 लाखांचं बक्षीस असलेल्या 27 नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. दरम्यान देशात नक्षलवादाचा अतिप्रभाव असलेल्या जिल्ह्यांची संख्या 3 पर्यंत कमी झाली आहे. तर एकूण नक्षल प्रभावित जिल्ह्यांची संख्या 18 वरुन 11 पर्यंत घसरली आहे, असं केंद्रीय गृहमंत्रालयानं सांगितलं आहे. येत्या 31 मार्चपर्यंत देशाला नक्षलवादमुक्त करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे.

**<u>बिहारमतदार यादी</u>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं 18 उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. आत्तापर्यंत भाजपानं 101 जागांसाठी उमेदवारांची घोषणा केली आहे.

**<u>श्रीलंका-पीएम भेट</u>**

श्रीलंकेच्या पंतप्रधान हरिणी अमरासुरिया आजपासून दोन दिवसांच्या भारत भेटीवर येत आहेत. श्रीलंकेच्या पंतप्रधान पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांची ही पहिलीच भारत भेट आहे. या भेटी दरम्यान त्या वरिष्ठ नेत्यांशी द्विपक्षीय मुद्यांवर चर्चा करणार आहेत, त्याचबरोबर विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या मुद्दयावर देखील चर्चा करणार आहेत. नवी दिल्ली इथं एनडिटीव्ही आणि चिंतन रिसर्च फाउंडेशन यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या एनडिटीव्ही वर्ल्ड समिट मध्ये श्रीलंकेच्या पंतप्रधानचं मुख्य भाषण होणयार आहे. अमरासुरिया यांच्याकडे श्रीलंकेच्या शिक्षण खात्याचाही पदभार असल्यामुळे त्या भारतीय तंत्रज्ञान संस्था दिल्ली आणि नीती आयोगाला भेट देणार आहेत. अमरासुरिया दिल्ली विद्यापीठातील हिंदू महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी असल्यानं त्या या महाविद्यालयालाही या भेट देणार आहेत.

**सोलापूर-विमानसेवा**

सोलापूर-मुंबई विमानसेवेमुळे सोलापूर परिसरातील औद्योगिक विकासाला गती आणि पर्यटनक्षेत्राला चालना मिळून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. सोलापूर-मुंबई विमानसेवेचा प्रारंभ केल्यानंतर ते काल बोलत होते. हवाई सेवेची उपलब्धता पाहून उद्योजक गुंतवणुकीचा निर्णय घेतात, त्यामुळे जगाच्या बाजाराशी जोडले जात असतांना विमानसेवा महत्वाची असल्याचं त्यांनी सांगितलं. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील सर्वाधिक विमानतळ कार्यान्वित असून, राज्यातील विमानसेवेचा विस्तार करण्यासाठी आवश्यक सुविधांचा विकास करण्यात येत असल्याचं केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी नमूद केलं.

**समुद्रशक्ती**

विशाखापट्टणम इथं भारतीय नौदलातर्फे समुद्र शक्ति 2025 या पाचव्या इंडो-इंडोनेशियाई संयुक्त द्विपक्षीय सागरी सरावाचं आयोजन करण्यात आलं आहे. शुक्रवार पर्यंत सुरू राहणाऱ्या या सरावादरम्यान सहभागी तुकड्यांमधील पूर्व नौदल कमांडच्या नेतृत्वाखालील ताफ्याची आयएनएस करवत्ती ही पाणबुडी रोधी युद्ध नौका आणि इंडोनेशियन नौदलाचे केआरआय जॉन ली या जहाजाचा समावेश आहे. परस्पर कार्यक्षमता वाढवणं, परस्पर सामंजस्य मजबूत करणं आणि दोन्ही नौदलांमधील सर्वोत्तम पद्धती सामायिक करणं हा या समुद्र शक्ति सरावाचा उद्देश आहे.

**क्रिकेट**

आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतला कोलंबोमधील कालचा सामना पावसामुळे रद्द करण्यात आला, त्या मुळे पाकिस्तान आणि इंग्लंड संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला. अद्याप एकही सामना न जिंकता आलेल्या पाकिस्तानसाठी हा एक मोठा धक्का आहे. आज या स्पर्धेत ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेश यांच्यात लढत होणार आहे. विशाखापट्टणम इथं दुपारी 3 वाजता सामना सुरु होईल.

**राष्ट्रकुल 2030**

2030मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी यजमान शहर म्हणून गुजरातमधील अहमदाबाद शहराची शिफारस करण्यात आली आहे. भारताच्या क्रीडा क्षेत्रासाठी ही एक ऐतिहासिक बाब मानली जात आहे. राष्ट्रकुल क्रीडा संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या क्रीडा स्पर्धा राष्ट्रकुल क्रीडा चळवळीच्या शताब्दी समारंभाच्या अनुषंगानं होणार आहेत. पुढच्या महिन्यात होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा संघटनेच्या महासभेसमोर ही शिफारस मांडण्यात येईल. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या घटनेबद्दल आनंद व्यक्त केला असून याचं श्रेय पंतप्रधान मोदींच्या दूरदर्शी नेतृत्वाला दिलं आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांसाठी अहमदाबादची निवड होणं हा भारतासाठी अभिमानाचा क्षण असेल असं केंद्रीय क्रीडा मंत्री मानसुख मांडविय यांनी म्हटलं आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**